# मराठी साप्ताहीक पोलीस पत्रिका
# कार्यालय पोलीस अधीक्षक
# नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर



अ.क. 20 दिनांक 12.05.2025 ते 16.05.2025 ( भाग 1 ते 5 )

## भाग –1 (नियुक्ती,निवृत्त,बदली,पदान्नती)

**निरंक**

## भाग –2 (रजा,वेतननिश्चती)

१) **क्रमांक :-** नाजिग्रा/ डि-१३ / वार्षीक वेतनवाढ/पो.अं.८४०,९४१,९५९,१११०/ /२०२४, नागपुर दि.

**– आदेश –**

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. पोमंस/मावक/अज अधिकारी–कर्मचारी/कार्यवाही/२२/२०१९ दिनांक ९/३/२०२३ तसेच विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर यांचे पत्र क्रमांक विपोमनी/डी–३/अधिसंख्य पदे/नागपूर ग्रा ७५१३/२०२३ दिनांक ०२/११/२०२३ नुसार पोलीस अधीक्षक, कार्यालय नागपूर ग्रामीण या आस्थापनेवरील अनुसूचित जमातीचे कार्यरत असलेले पोलीस अंमलदारांना या कार्यालयाचे आदेश क्र. पोअ/नाजिग्रा/ प्र. लि/अधि.पदा.अ.यांना वे.वा.दे./१०३४४/२९०२३ दिनांक २५/११/२०२३ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ च्या नियम ३६ व ३९ अथवा महाराष्ट्र नागपूर सेवा (सुधारीत वेतन) शासन अधिसुचना वित्त विभाग दिनांक ३० जानेवारी २०१९ मधील नियम ९ व १० अन्वये च्या दिलेल्या निर्देशानुसार वेतनवाढ मंजुर करण्यात आलेली आहे.

या कार्यालयाचे पत्र क्र. नाजिग्रा/डी–१३/वेतनवाढ– जुलै– २०२४ /मंजुर/५९४४ /२०२४ दिनांक ४/७/२०२४ अन्वये, अधिसंख्य पदावरील खालील नमूद पोलीस अंमलदार यांना जुलै/२०२४ ची वेतनवाढ देण्यात आलेली आहे.

वरीष्ठ कोषागार अधिकारी, नागपूर यांचे सुचना पत्र दिनांक १९/०७/२०२४ अन्वये सुचना दिल्याने या कार्यालयाचे पत्र क्र. पो. अ./नाजिग्रा/प्र.लि.लेखाशाखा/ अधिसंख्यपद/ वेतनवाढ/ २०२४–७२६५ ,दिनांक २३/७/२०२४ अन्वये सदर पोलीस अंमलदार यांना दिनांक ०१/०७/२०२४ अन्वये देण्यात आलेली वार्षिक वेतनवाढ रद्द करण्याबाबत पत्र प्राप्त झाल्याने त्याअन्वये सदर नमूद पोलीस अंमलदार अ.क्र. ०१ ते ०४ यांची खालील प्रमाणे **जुलै/२०२४** ची वार्षिक वेतनवाढ रद्द करण्यांत येत आहे.

**वेतनसंरचना**

| पदनाम | सुधारीत वेतन स्तर |
|---|---|
| सहायक पोलीस उपनिरीक्षक | एस–१० :– २९२००–९२३०० |
| पोलीस हवालदार | एस–०९:– २६४००–८३६०० |
| नाईक शिपाई | एस–०८:– २५५००–८११०० |
| पोलीस शिपाई | एस–०७:– २१७००–६९१०० |

१. **पोहवा/८४० विजय धर्मदास कुमेरिया ,पोलीस मुख्यालय, नागपूर ग्रामीण**

| वेतनवाढीचा दिनांक | मॅट्रीक्स स्तर | पुर्वीचे वेतन | वेतनवाढीचा दिनांक | वेतनवाढ रद्द नंतरचे वेतन | मॅट्रीक्स स्तर | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १.७.२०२३ | एस—९ | ४११००/— | १.०७.२०२३ | ४११००/— | एस—९ | या कार्यालयाचे पत्रक्र.नाजिग्रा/ डी—१३/ वेतनवाढ —जुलै—२०२४/ मंजुर/५९४४ /२४ दि. ४/७/२०२४ अन्वये, देण्यात आलेली वेतनवाढ रद्द करुन दि. १/७/२०२४ ला **४११००/— अनुज्ञेय राहील**. |
| १.७.२०२४ | एस—९ | ४२३००/— | १.०७.२०२४ | **४११००/—** | एस—९ | |

२. <u>पोशि/९४१ लोकेश नारनवरे , पोलीस मुख्यालय, नागपूर ग्रामीण</u>

| वेतनवाढीचा दिनांक | मॅट्रीक्स स्तर | पुर्वीचे वेतन | वेतनवाढीचा दिनांक | वेतनवाढ रद्द नंतरचे वेतन | मॅट्रीक्स स्तर | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १.७.२०२३ | एस—७ | २५२००/— | १.०७.२०२३ | २५२००/— | एस—७ | या कार्यालयाचे पत्रक्र. नाजिग्रा/ डी—१३/वेतनवाढ—जुलै—२०२४/मंजुर /५९४४ /२०२४ दि.४/७/२०२४ अन्वये, देण्यात आलेली वेतनवाढ रद्द करुन दि. १/७/२०२४ ला **२५२००/— अनुज्ञेय राहील.** |
| १.७.२०२४ | एस—७ | २६०००/— | १.०७.२०२४ | **२५२००/—** | एस—७ | |

३. <u>पोशि/९५९ श्रींकात नरेश कुमरे, पोलीस मुख्यालय, नागपूर ग्रामीण</u>

| वेतनवाढीचा दिनांक | मॅट्रीक्स स्तर | पुर्वीचे वेतन | वेतनवाढीचा दिनांक | वेतनवाढ रद्द नंतरचे वेतन | मॅट्रीक्स स्तर | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १.७.२०२३ | एस—७ | २८४००/— | १.०७.२०२३ | २८४००/— | एस—७ | या कार्यालयाचे पत्रक्र. नाजिग्रा/ डी—१३/वेतनवाढ—जुलै—२०२४/मंजुर /५९४४ /२०२४ दि.४/७/२०२४ अन्वये, देण्यात आलेली वेतनवाढ रद्द करुन दि. १/७/२०२४ ला **२८४००/— अनुज्ञेय राहील.** |
| १.७.२०२४ | एस—७ | २९३००/— | १.०७.२०२४ | **२८४००/—** | एस—७ | |

४. <u>पोशि/१११० कृष्णा जयराम नागोसे, पोलीस स्टेशन अरोली, नागपूर ग्रामीण</u>

| वेतनवाढीचा दिनांक | मॅट्रीक्स स्तर | पुर्वीचे वेतन | वेतनवाढीचा दिनांक | वेतनवाढ रद्द नंतरचे वेतन | मॅट्रीक्स स्तर | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १.७.२०२३ | एस—७ | ३०२००/— | १.०७.२०२३ | ३०२००/— | एस—७ | या कार्यालयाचे पत्रक्र. नाजिग्रा/ डी—१३/वेतनवाढ—जुलै—२०२४ /मंजुर/५९४४ /२०२४ दि. ४/७/२०२४ अन्वये, देण्यात आलेली वेतनवाढ रद्द करुन दि. १/७/२०२४ ला **३०२००/— अनुज्ञेय राहील**. |
| १.७.२०२४ | एस—७ | ३११००/— | १.०७.२०२४ | **३०२००/—** | एस—७ | |

वरील नमुद पोलीस अंमलदार अ.क्र. ०१ ते ०४ यांच्या नावांसमोर दर्शविल्याप्रमाणे दिनांक ०१/०७/२०२४ ची वेतनवाढ अनुज्ञेय राहील.

**२) क्र: / नाजिग्रा-डी- १३ /मपोशी /८९६ अश्विनी चट्टे / वाढीव अर्जित रजा/२४५९२/२०२४नागपुर दिनांक २७/११/२०२४**

## आदेश

खालील नमुद महिला पोलीस अंमलदार यांनी स्वतः च्या लग्नाकरिता मागितलेली वाढीव अर्जित रजा खालीलप्रमाणे मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस अंमलदार यांचे नाव व बक्कल नंबर | नेमणूक | अर्जित रजा |
|---|---|---|---|
| 1 | मपोशी अश्विनी चट्टे ८९६/ | नेमणूक पोलीस मुख्यालय | १५ दिवस वाढीव अर्जित रजा |

**३) क्रमांक:नाजीग्रा/डी-१३/चापोहवा/ ९०५ मनोज , परावर्तित रजा / २४६८५/२०२४,नागपूर दिनाक २८/११/२०२४**

## आदेश

चापोहवा मनोज रामचंद्र कश्यप ९०५ / , नेमणुक मोटार परिवहन विभाग नागपूर ग्रामीण दिनांक ११/०९/२०२४ ते २८/०९/२०२४ पर्यत १८ दिवस सिक रजा कालावधी वैद्कीय कागदपत्राच्या आधारे महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम १९८१च्या तरतुदीनुसार परावर्तीत रजा नियम — ६१ प्रमाणे रजा मंजूर करण्यात येत आहे.

**४) क्रमांक:नाजीग्रा/डी-१३/पोशी /८६० शालिक , परावर्तित रजा / २४६८४/२०२४,नागपूर दिनाक २८/११/२०२४**

पोशी८६०/ शालिक घासले , नेमणुक पोलीस मुख्यालय, नागपूर ग्रामीण .दि०६/०९/२०२४ ते १४/०९/२०२४ पर्यंत ०९ दिवस अनधिकृत गैरहजर कालावधी वैद्कीय कागदपत्राच्या आधारे महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम १९८१च्या तरतुदीनुसार परावर्तीत रजा नियम — ६१ प्रमाणे रजा मंजूर करण्यात येत आहे.

**५) क्र: / नाजिग्रा-डी- १३ /मपोशी /११५० शुभांगी / वाढीव अर्जित रजा/२४९३८/२०२४नागपुर दिनांक १७/११/२०२४**

आदेश

खालील नमुद महिला पोलीस अंमलदार यांनी स्वतः च्या लग्नाकरिता मागितलेली वाढीव अर्जित रजा खालीलप्रमाणे मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीसअंमलदार यांचे नाव व बक्क्ल नंबर | नेमणूक | अर्जित रजा |
|---|---|---|---|
| 1 | मपोशी /११५० शुभांगी एकनाथ झलके | पोलीस स्टेशन वेलतूर | १० दिवस वाढीव अर्जित रजा |

**६) क्र: / नाजिग्रा-डी- १३ /सफो/ १५४२ अशोक / सिक रजा/१२९३२९/२०२४ नागपुर दिनांक २३/०९/२०२४**

**आदेश**

सफो 1542 अशोक अर्जुन पाटील नेमणुक ना.ह.स. नागपुर परिक्षेत्र नागपूर यांची दिनांक 26/01/2024 ते 06/02/2024 पर्यत एकून 12 दिवस सिक कालावधी वैदयकीय कागदपत्राच्या आधारे महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम 1981च्या तरतुदीनुसार नियम - 61अन्वये परिवतीत रजेत मंजूर करण्यात येत आहे.

**७) क्रमांकः नाजीग्रा/डी-13/ पोहवा / 1632 नजीर शेख/सिक रजा/ 21221 2024, नागपुर दिनाक २७/९/२०२४**

**आदेश**

पोहवा /1632 नजीर शेख, नेमणुक पोलीस मुख्यालय नागपूर ग्रा. यांची एकूण 45 दिवस सिक कालावधी पैकी दिनांक 6/10/2023 ते 25/10/2023 पर्यंत एकूण 20 दिवस सिक कालावधी वैदयकीय कागदपत्राच्या आधारे महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम 1981च्या तरतुदीनुसार नियन - 61 अन्वये परिवर्तीत रजेत मंजूर करण्यात येत आहे. तसेच दिनांक 26/10/2023 ते 20/1/2023 एकूण 25 दिवस सिक कालावधी महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम 1981च्या तरतुदीनुसार नियम 63 अन्वये असाधारण रजेत मंजूर करण्यात येत आहे.

8)**क्रमांकः नाजीग्रा /डी-13/ मपोहवा/1064 कोमल जुमडे / परिवर्तीतरजा /20980/ 20140 / 2024, नागपूर दिनाक 25/09/2024**

**आदेश**

मपोहवा / 1064 कोमल जुमडे , नेम. डायल 112, नागपूर ग्रामीण यांचा दिनांक 27/12/2024 ते 14/02/2024 एकूण 18 दिवस सिक रजा कालावधी वैदकीय कागपत्राचे आधारे महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम 1981च्या तरतुदीनुसार नियम 61 परिवर्तीत रजेत प्रमाणे परिवर्तीत रजा मंजूर करण्यात येत आहे.

9)**क्रमांकः नाजीग्रा/डी-13/ पोहवा /1141 प्रकाश / सिक रजा/ २०७४२/2024, नागपुर दिनाक २३/९/२०२४**

**आदेश**

पोहवा / 1141 प्रकाश उमराव डोये नेमणुक पो.स्टे. सावनेर नागपूर ग्रामीण यांचा दिनांक 18/05/2024 ते 01/06/2024 पर्यंत 15 दिवस सिक कालावधी वैदयकीय कागदपत्राच्या आधारे महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम 1981च्या तरतुदीनुसार नियम 61 अन्वये परिवर्तीत रजेत मंजूर करण्यात येत आहे.

**10)क्रमांकः नाजीग्रा/डी-13/मपोशो/1106 नेहा / परावर्तित रजा/ अर्जित/202509/2024, नागपुर दिनाक १७/१०/२५**

**आदेश**

मपोशी / 1106 नेहा प्रमोदराव यादव, नेमणुक CCTTNS नागपूर ग्रामीण हे दि. 12/06/2024 ते 29/07/2024 पर्वत 47 दिवस सिक कालावधी वैद्कीय कागदपत्राच्या आधारे दि. 12/06/2024 ते 12/07/2024 पर्यंत 30 दिवस सिक कालावधी महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम 1981च्या तरतुदीनुसार नियम 61 प्रमाणे परावर्तीत रजेत मंजूर करण्यात येत आहे, तसेच सेवापटात अर्थवेतनी रजा शिल्लक नसल्यामुळे उर्वरित दि. 13/07/2024 ते 29/07/2024 पर्यंत 17 दिवस सिक कालावधी महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम 1981च्या तरतुदीनुसार नियम 50 प्रमाणे अर्जित रजेत मंजूर करण्यात येत आहे.

**11)क्रमांकः नाजोग्रा/डी-13/ मनापोशी/ 1009 पूनम, परावर्तित रजा / २२९४८/2024, नागपूर दिनाक २५/१०/२०१९**

**आदेश**

मनापोशी/ 1009 पूनम मिश्रा, नेमणुक पोलीस मुख्यालय नागपूर ग्रा. हे दि. 01/08/2024 ते 07/08/2024 पर्वत 07 दिवस सिक कालावधी वैदकीय कागदपत्राच्या आधारे महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम 1981च्या तरतुदीनुसार परावर्तीत रजा नियम 61 प्रमाणे रजा मंजूर करण्यात येत आहे.

**१२)क्रमांक :— नाजिग्रा/आस्था—डी—११ वे.नि./पदोन्नती—पोहवा ते सफौ./ ४०५२/२०२५ नागपूर दि. १४/०५/२०२५**

**:—पदोन्नती वेतननिश्चितीचा आदेश—:**

शासन अधिसुचना वित विभाग क्र. वेपुर—२०१९/प्र.क्र. /सेवा.९. दिनांक ३० जानेवारी २०१९ महाराष्ट्र नागरीसेवा(सुधारीत वेतन)नियम—२०१९ दिनांक १ जानेवारी २०१६ पासुन राज्य शासकीय कर्मचा—यांना लागु करण्यांत आलेली आहे. या कार्यालयाचे आदेश क्रमांक नाजिग्रा/डी—९/पदोन्नती—सफौ./५४५४/दिनांक १०/०६/२०२४ अन्वये, खालील नमुद पोलीस हवालदार अंमलदार—य १०/०६/२०२४ पासुन सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक या रिक्त पदावर तात्पुरत्या स्वरूपात पदोन्नती दिल्याने त्यांना पदोन्नतीच्या पदाची वेतनस्तर एस—१०(२९२००—८९६००) मध्ये पदोन्नतीच्या दिनांका पासुन पुढील प्रमाणे वेतननिश्चिती करण्यांत येत आहे.

**वेतन संरचना :—**

| पदनाम | सुधारीत वेतनस्तर |
|---|---|
| **पोलीस हवालदार** | **एस—९ :— २६४००—८३६००** |
| **सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक** | **एस—१०:— २९२००—९२३००** |

**१.पोहवा/१८१ प्रकाश बळीराम खोपे, पोस्टे, नरखेड**

| १. दिलेले वेतन | | | पदोन्नतीचे वेतन | | | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| दिनांक | वेतनस्तर | वेतन | दिनांक | वेतनस्तर | वेतन | |
| **१.७.२०२३** | एस—९ | ४४९०० | १०.६.२०२४ सफौ पदोन्नती | एस—१० | ४५४०० | सफौ.पदावर पदोन्नती |
| **१.७.२०२४** | एस—९ | ४६२०० | १.७.२०२४ | एस—९ | ४६२०० | पोहवा पदावरील नियमीत वेतनवाढ |
| | | | १.७.२०२४ | एस—९ | ४७६०० | पदोन्नती वेतनवाढ |
| | | | १.७.२०२४ | एस—१० | ४८२०० | एस— १० मधील टप्पा |

**२. पोहवा/११३सुनिल नामदेव फाये,नेमणुक,पोस्टे, खापरखेडा**

| दिलेले वेतन | | | पदोन्नतीचे वेतन | | | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| दिनांक | वेतनस्तर | वेतन | दिनांक | वेतनस्तर | वेतन | |
| **१.७.२०२३** | एस—९ | ४४९०० | १०.६.२०२४ सफौ पदोन्नती | एस—१० | ४५४०० | सफौ.पदावर पदोन्नती |
| **१.७.२०२४** | एस—९ | ४६२०० | १.७.२०२४ | एस—९ | ४६२०० | पोहवा पदावरील नियमीत वेतनवाढ |
| | | | १.७.२०२४ | एस—९ | ४७६०० | पदोन्नती वेतनवाढ |
| | | | १.७.२०२४ | एस—१० | ४८२०० | एस— १०मधील टप्पा |

या कार्यालयाचे आदेश क्रमांक नाजिग्रा/डी–९/पदोन्नती–सफौ./५८९८/दिनांक ०३/०७/२०२४ अन्वये, पोलीस हवालदार यांची सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक पदावरील पदोन्नतीची वेतननिश्चिती करण्यात येत असून शासन परिपत्रक, वित विभाग क्रमांक संकिर्ण–२०२१/प्र.क्र.५२/सेवा–३, दिनांक २२.११.२०२१, अन्वये, अटी व शर्ती नुसार भविष्यात अतिप्रदान झाल्याचे निर्देशनास आल्यास अतिप्रदान वसुली करण्यांत येईल.

**13)क्र:-नाजिग्रा/डी-११ / पोशि/०७ खंडागळे / अर्जित- प्रत्यार्पितरजा / 4129/२०२५ नागपुर दिनांक 16/०५/२०२५**

## आदेश

खालील नमुद पोलीस अंमलदारयांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम 1981 मधील नियम क्रमाक 50 , 15/15 दिवसाची अर्जित रजा तसेच शासन , निर्णय क्रमांक एलव्हीई – 2002/प्र .क्र .564 /पोल -5 (ब ) , दिनांक 27/02/2024 व महाराष्ट्र नुसार २०२५ -२०२६ या वित्तीय वर्षाकरिता रजेवर 15 **दिवसाची अर्जित रजा /** प्रत्यार्पित करण्याचे परवागीसह मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस अंमलदार यांचे नाव व बक्कल नंबर | नेमणूक | प्रत्यार्पितरजा | अर्जित रजा |
|---|---|---|---|---|
| 1 | पोशिवैभव गोरक्ष खंडागळे ०७/, | नेमणूक<br>पोलीस मुख्यालय नागपूर ग्रामीण, नागपूर | 15 दिवस | 15 दिवस |

सदरचा खर्च 2025- पोलीस -109 जिल्हा पोलीस (00)(01) जिल्हा पोलीस दल- वेतन या लेखाशीर्षाअंतर्गत सन 2025 -2026 या वित्तीय वर्षाचे मंजूर असलेल्या वित्तीय अनुदानातून भागविण्याची येईल.

**14)क्रः-नाजिग्रा / डी-११/पोशि 91/परिवर्तीत रजा /३८४१५/ २०२५ नागपुर दिनांक १४/०५/२०२५**

आदेश

पोशि/९१ आशिफ शेख, नेमणूक पोलीस मुख्यालय नागपूर ग्रामीण नागपूर यांची दिनांक २०/०३/२०२५ ते ०४/०४/२०२५ पर्यत १६ दिवस परिवर्तीत रजा वैदकीय कागदपत्राच्या आधारे मंजूर करण्यात येत आहे.

**१५)क्रः-नाजिग्रा/ डी-11/ पोशि-२७३ / सिक/ ३९९४/ 2025 नागपुर दिनांक 13/ 05 / 2024**

## आदेश

पोशि/२७३ अभिषेक पांडे, नेमणुक पोस्टे खापा यांना मा. प्र. पोलीस अधीक्षक याचे आज्ञाकिंत कक्ष दि. ०२/०५/२०२५ रोजी पोशी यांना हजर करून घेण्यात आले आहे. महाराष्ट्र नागरी सेवा रजा नियम 1981 मधील नियम क्र. 63 अन्वये दिनांक ०९/०४/२०२५ ते ०२/०५/२०२५ पर्यत २४ दिवस सिक रजा कालावधी २४ दिवस असाधारण रजा मंजूर करण्यात येत आहे.

# भाग —३ (कसुरी,शिक्षा)

**१) क्रमांकः— नाजिग्रा/डी—१०/निलंबन/मपोहवा—१७१६ दिपमाला जाधव/२०२५/३३६० दिनांक :— १५/०४/२०२५**

## निलंबन आदेश

१) आपण पो.स्टे. उमरेड येथे कार्यरत असतांना आपलेकडे कोर्टाकडुन प्राप्त होणा—या समन्स व वारंटच्या नोंदी घेण्याचे काम दिले होते. क्रिमीनल अप्लीकेशन ८०३/२०१८ दिनांक ०९/११/२०२२, क्रिमीनल अप्लीकेशन ७८०/२०२० व ५२१/२०२३ या प्रकरणात मा.कौटुंबिक न्यायालय, वडोदरा, गुजरात यांनी दिनांक ०५/०८/२०२२ व दि. ०९/११/२०२२ अन्वये तिन वारंट निर्गमीत केले होते. सदरहु वारंट डाक विभागा मार्फत पो.स्टे.ला प्राप्त झाले असुन सदरहु वारंटच्या नोंदी घेवुन समन्स वारंट बजाविण्याचे काम करीत असलेल्या अंमलदारास देणे आपले कर्तव्य होते. तसेच वारंट पो.स्टे.ला प्राप्त झाल्याबाबत वरिष्ठांचे निदर्शनास आणुन देणे सुध्दा आपले कर्तव्य होते. परंतु उपरोक्त वारंट प्राप्त झाल्याबाबत नोंदवहीत नोंदी न घेतल्याने सदर वारंट संबंधीत व्यक्तीस वेळीच बजाविण्यात आले नाही. त्यामुळे मा.कौटुंबिक न्यायालय, वडोदरा यांनी दिनांक १२/०३/२०२५ रोजी नोटीसव्दारे सदर वारंट बजावणीच्या अनुषंगाने झालेल्या दिरंगाई व निष्काळजीपणा बाबत उत्तर देणे कामी **आम्हास** दिनांक २७/०३/२०२५ रोजी समक्ष हजर रहावे असे कळविले होते. परंतु त्यानंतर मा.न्यायालयाने त्यांचे निबंधक/रजिस्ट्रार यांना आमचे व पोलीस निरीक्षक पो.स्टे. उमरेड यांचे विरूध्द ८ दिवसाचे आत विविध कलमाव्दारे गुन्हे दाखल करण्यात यावे असे आदेश दिलेले आहेत.करीता आपण शासकीय कर्तव्यात निष्काळजीपणा, बेजबाबदारपणा व गैरवर्तन केल्याचे दिसुन येत आहे.

२) सदर प्रकरणातील गैरवर्तणुकीबाबत चौकशी योजिली असल्याने मुंबई पोलीस (शिक्षा व अपीले) नियम १९५६ मधील नियम क्रमांक ३ (१—अ) (एक) (अ) व (ब) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून, आपणास आदेश प्राप्त झाल्याचे दिनांका पासुन शासकीय सेवेतून **निलंबीत** करण्यात येत आहे.

३) निलंबीत अवस्थेत आपणास आपल्या सरासरी वेतनाच्या अर्धा, इतका निर्वाह भत्ता व त्यावरील अनुज्ञेय महागाई भत्ता मिळेल आणि यासंबधाने पुढील आदेश ३ महीन्याचे निलंबन कालावधी पुर्ण झाल्यानंतर महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९८१ मधील ६८ अन्वये देण्यात येईल. तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम १९७९ मधील नियम १६ नुसार आपणास निलंबन अवस्थेत खाजगी नौकरी अथवा धंदा करता येणार नाही. निलंबन अवस्थेत खाजगी नौकरी अथवा धंदा केल्यास आपण गैरवर्तणुकीस पात्र ठराल व याबाबत आपले विरूध्द शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यात येईल. अश्या प्रकरणामुळे आपण आपला निर्वाह भत्त्याचा हक्क ही गमावुन बसाल. त्याकरीता आपण महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे या काळातील प्रदाने) नियम, १९८१ मधील नियम ६९(४) नुसार आवश्यक असलेले प्रमाणपत्र दर महिन्यात राखीव पोलीस निरीक्षक, मुख्यालय, नागपूर ग्रामीण, नागपुर यांचेकडे सादर करावे.

४) आपणास निलंबीत केलेल्या तारखेला मिळत असलेला इतकाच स्थानिक पुरक भत्ता काढण्यात येईल आणि तो आपणास निलंबीत अवस्थेत देण्यात येईल. पण त्याकरीता आपणास जेथुन निलंबीत करण्यात आले त्या ठिकाणी आपण स्वत: किंवा कुटुंब अथवा दोन्ही निलंबन अवस्थेत राहात होते असे आपण प्रमाणीत करावयास पाहीजे. निलंबन अवस्थेत निलंबनापुर्वी नियमानुसार मिळणारा घरभाडे भत्ताही आपणास देण्यात येईल.

५) निलंबन कालावधीत आपणाकडे सोपविलेल्या कार्य व विशेष अधिकारापासुन निलंबीत राहतील, परंतु आपण पोलीस कर्मचारी म्हणून असण्याचे बंद होणार नाही आणि आपणास निलंबीत करण्यात आले नसते तर आपण ज्या शिस्त व वर्तणुक संबधीच्या नियमात बाध्य राहीले असते, त्याच शिस्त, वर्तणुक संबधीच्या नियमास आपण बाध्य राहाल.

६) निलंबीत अवस्थेत आपले मुख्यालय, पोलीस मुख्यालय, नागपुर ग्रामीण, येथे ठेवण्यात येत आहे. आपण पोलीस अधिक्षक यांचे लेखी परवानगी शिवाय मुख्यालय सोडु शकणार नाही.

७) निलंबीत अवस्थेत, आपण, राखीव पोलीस निरिक्षक, पोलीस मुख्यालय, नागपुर ग्रामीण, यांचेकडे दररोज सकाळी व सायंकाळी हजेरी लावावी. तसेच दर मंगळवार व शुक्रवारला होणा—या परेडचे वेळी पोलीस मुख्यालय येथे हजर राहावे.

८) आपण, आपली सरकारी किट (संपुर्ण वर्दी), शस्त्र व ईतर सरंजाम ओळखपत्रासह पोलीस मुख्यालय येथे ताबडतोब जमा करावे

९) महाराष्ट्र शासन वित्त विभाग अधिसूचना क्रमांक निलंबन १००५/प्र.क्र.१७/सेवा–८ दिनांक १६ जून २००६ अन्वये महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम, १९८१ च्या नियम ६८ मधील पोट–नियम (१) च्या खंड (अ) मध्ये दाखल करण्यात आलेले खालील परंतुक आपले निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

“परंतु आणखी असे की, शासकीय कर्मचाऱ्याचे निलंबन आदेशात निर्धारित केलेल्या कोणत्याही शर्तीचा भंग केला आणि निलंबन आदेश देणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री पटली असेल तर, निलंबित कर्मचाऱ्यास दरमहा मिळत असलेल्या किमान निर्वाह भत्त्याच्या रकमेत पोट–नियम १ (ए)(एक) नुसार करण्यात आलेली वाढ/प्रस्तावित वाढ, सक्षम प्राधिकाऱ्यास किमान निर्वाह भत्त्याइतकी कमी करता येईल.

**२)क्रःनाजिग्रा/कसुरी/डी - १५/अंतिम आदेश/ पोउपनि/ अंमोल तांबे / पो.स्टे. देवलापार/ ३९८२/२०२५ नागपूर दिनांकः-१३/०५/२०२५**

## आदेश

कसुरदाराचे नावः- पोउपनि / अंमोल तांबे, नेमणुक पोलीस स्टेशन देवलापार नागपूर ग्रामिण नागपूर .

**कसुरी**

अत्यंत बेशिस्तपणे ,बेजबाबदारपणा व कर्तव्यच्युस्तीयुक्त आचरण की, आपण पोलीस स्टेशन, देवलापार येथे नेमणुक असून, आपण पोस्टे हद्दीत पवनी बिट मध्ये बिट प्रमुख असून दिनांक ०९/०२/२०२५ रोजी मुकनापूर जंगल शिवार, रामटेक गावाकडे जाणाऱ्या मार्गावर गणेश शरणागत यांच्या शेतामध्ये पोल्ट्री फार्म च्या शेडमध्ये पैश्याचे हारजीत जुगार खेळत असल्याची माहिती गोपनिय माहितीव्दारे सहा पोलीस अधीक्षक व उपविभागीय पोलीस अधिकारी, सावनेर विभाग, सावनेर, नागपूर ग्रामीण यांच्या आदेशाने कार्यवाही करुन एकुण २७ इसम जुगार खेळत मिळून आल्याने त्यांचे कडून अंदाजी रक्कम एकुण. ५५,८०,०००/- मुद्देमाल मध्ये एकुण १२ वाहन व २२ मोबाईल फोन जप्त करुन पोलीस स्टेशन देवलापार येथे अप.क्र. ५६/२०२५ कलम ११२ बीएनएस सहकलम ४, ५ म.जु.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेले आहे. आपण अधिकारी पदावर कार्यरत असून आपले कर्तव्य प्रामाणिकपणे व जबाबदारीने बाजवने अपेक्षित होते. आपल्या बिट हद्दीत स्थानीक गुन्हे शाखा यांचे कडून कार्यवाही करण्यात आली. यावरुन आपल्या बिट हद्दीत अवैध धंदे सुरु असल्याचे दिसून येत आहे. आपल्या बिट हद्दीत अवैध धंदयावर आळा घालणे तसेच अवैध धंदयाचे समुळ उच्चाटन करणे हे आपले कर्तव्य आहे यांची जाणीव असतांना सुध्दा आपण अवैध धंदयाचे समुळे उच्चाटन करण्यास असमर्थ राहीले आहे. शासनाने ठरवून दिलेल्या कायदे व नियमाप्रमाणे कायदेशिर कार्यवाही करण्यात येत नसल्याचे दिसून येत आहे. तसेच शासकीय कामात वरिष्ठानी दिलेल्या सुचना व निर्देशाकडे जाणिपुर्वक निष्काळजीपणा व टाळाटाळ करीत असून वरिष्ठांने आदेशाची अवहेलना करीत असल्याचे दिसून येत आहे. करीता आपण आपले कर्तव्या कसुर केला आहे.

उपरोक्त कसुरीबाबत आपणास महाराष्ट्र पोलीस नियम १९५६(शिक्षा व अपील) मधील नियम क्र. ३(२)(५) मध्ये नमुद केल्याप्रमाणे " **एक महिण्याचे मुळ वेतन आर्थीक दंड** " ही शिक्षाचे कारणे दाखवा नोटीस दि २०/०२/२०२५ निर्गमित करण्यात आलेले आहे. त्यानुषंगाने आपण कारणे दाखवा नोटीस तामील करुन स्पष्टीकरण सादर केलेले असून सदरचे स्पष्टीकरणाचे अवलोकन अशतः अमाधानकारक असल्याने कारणे दाखवा नोटीस मध्ये प्रस्तावित केलेल्या शिक्षेत फेरबद्दल करुन खालील प्रमाणे आदेश देत आहे.

## -:अंतिम आदेश :-

मी, **रमेश धुमाळ**, प्रभारी पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आदेशाव्दारे पोउपनि/अंमोल तांबे, नेमणुक पोलीस स्टेशना देवलापार, नागपूर ग्रामीण, नागपूर. यांना महाराष्ट्र पोलीस नियम १९५६ (शिक्षा व अपील ) मधील नियम क्र. ३(२)(५) मध्ये नमुद केल्याप्रमाणे" **रु ५०००/- आथीर्क दंड**" ही शिक्षा देत आहे. सदरची शिक्षा आपणास मान्य नसल्यास अथवा आपली ईच्छा असल्यास सदर आदेश तामील झाल्याच्या दिनांकापासून ६० (साठ) दिवसाच्या आत आपण विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर यांचे कडे अपील अर्ज योग्य मार्फतीने सादर करु शक्ता

**३) क्रःनाजिग्रा/कसुरी/डी- १५/ अं.आ./पोहवा/९८० मोहम्मद सलीम /पो.स्टे. देवलापार/३९८१/२०२५ नागपूर दिनांकः-१३/०५/२०२५**

**आदेश**

कसुरदाराचे नावः- पोहवा/ ९८० मोहम्मद सलीम,नेमणुक पोलीस स्टेशनदेवलापार नागपूर ग्रामिण नागपूर .

**कसुरी**

अत्यंत बेशिस्तपणे ,बेजबाबदारपणा व कर्तव्यच्युस्तीयुक्त आचरण की, , आपण पोलीस स्टेशन, देवलापार येथे नेमणुक असून, आपण पोस्टे हद्दीत पवनी बिट मध्ये बिट प्रमुख असून दिनांक ०९/०२/२०२५ रोजी मुकनापूर जंगल शिवार, रामटेक गावाकडे जाणाऱ्या मार्गावर गणेश शरणागत यांच्या शेतामध्ये पोल्ट्री फार्म च्या शेडमध्ये पैश्याचे हारजीत जुगार खेळत असल्याची माहिती गोपनिय माहितीव्दारे सहा पोलीस अधीक्षक व उपविभागीय पोलीस अधिकारी, सावनेर विभाग, सावनेर, नागपूर ग्रामीण यांच्या आदेशाने कार्यवाही करुन एकुण २७ इसम जुगार खेळत मिळून आल्याने त्यांचे कडून एकुण अंदाजी रक्कम ५५,८०,०००/- मुद्देमाल मध्ये एकुण १२ वाहन व २२ मोबाईल फोन जप्त करुन पोलीस स्टेशन देवलापार येथे अप. क्र. ५६/२०२५ कलम ११२ बीएनएस सहकलम ४, ५ म.जु.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेले आहे.आपण बिट प्रमुख पदावर कार्यरत असून आपले कर्तव्य प्रामाणिकपणे व जबाबदारीने बाजवने अपेक्षित होते. आपल्या बिट हद्दीत स्थानीक गुन्हे शाखा यांचे कडून कार्यवाही करण्यात आली. यावरुन आपल्या बिट हद्दीत अवैध धंदे सुरु असल्याचे दिसून येत आहे.आपल्या बिट हद्दीत अवैध धंदयावर आळा घालणे तसेच अवैध धंदयाचे समुळ उच्चाटन करणे हे आपले कर्तव्य आहे यांची जाणीव असतांना सुध्दा आपण अवैध धंदयाचे समुळे उच्चाटन करण्यास असमर्थ राहीले आहे. शासनाने ठरवून दिलेल्या कायदे व नियमाप्रमाणे कायदेशिर कार्यवाही करण्यात येत नसल्याचे दिसून येत आहे. तसेच शासकीय कामात वरिष्ठानी दिलेल्या सुचना व निर्देशाकडे जाणिपुर्वक निष्काळजीपणा व टाळाटाळ करीत असून वरिष्ठांने आदेशाची अवहेलना करीत असल्याचे दिसून येत आहे. करीता आपण आपले कर्तव्या कसुर केला आहे.

उपरोक्त कसुरीबाबत आपणास महाराष्ट्र पोलीस नियम १९५६(शिक्षा व अपील) मधील नियम क्र. ३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे **"देय असलेली वार्षीक वेतनवाढ २ (दोन) वर्षाकरीता पुढील वेतनवाढीवर परीणाम न होता स्थगीत ठेवणे "** ही शिक्षाचे कारणे दाखवा नोटीस दि १४/०२/२०२५ निर्गमित करण्यात आलेले आहे. त्यानुषंगाने आपण कारणे दाखवा नोटीस तामील करुन स्पष्टीकरण सादर केलेले असून सदरचे स्पष्टीकरणाचे अवलोकन अशतः समाधानकारक असल्याने कारणे दाखवा नोटीस मध्ये प्रस्तावित केलेल्या शिक्षेत फेरबद्दल करुन खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**-:अंतिम आदेश :-**

मी, **रमेश धुमाळ,** प्रभारी पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आदेशाव्दारे पोहवा/ ९८० मोहम्मद सलीम, नेमणुक पोलीस स्टेशना देवलापार, नागपूर ग्रामीण, नागपूर. हे भविष्यात पुन्हा या प्रकारे चुक होणार नाही. याबाबत **"सक्त ताकीद"** ही शिक्षा देण्यात येत आहे.

**४) कमांक :– नाजिग्रा/डी–१०/पोशि–१२६१ देशमुख/विचौ/अं.आ./२०२५–४४२६ नागपूर दि.२७/०५/२०२५**

**आदेश**

**कसुरदारांचे नांव :– पोशि/१२६१ आदित्य देशमुख,** नेमणुक पोलीस मुख्यालय, नागपूर ग्रामीण

**दोषारोप :–** १) अत्यंत बेशिस्तपणा, बेजबाबदारपणा व कर्तव्यच्युतीयुक्त आचारण की, ज्यात आपण पोलीस मुख्यालय येथे नेमणुकीस असतांना, पोलीस मुख्यालय नागपुर ग्रामिण येथुन मा. श्री. अनिल देशमुख, माजी गृहमंत्री यांचे शस्त्र सुरक्षारक्षक म्हणुन डयुटी लावण्यात आली होती. मा. श्री. अनिल देशमुख यांचे सांगणे वरुन सुरक्षा रक्षकांना त्याचे वाहनात न बसविता त्यांचे मागे असलेल्या वाहनात बसवित होते. घटना तारखेला मा. अनिल देशमुख साहेबांचे सांगण्यावरून नेहमी प्रमाणे आपण आपले सहकारी सुरक्षा रक्षकासह मागील वाहनात बसले होते. विधानसभा सार्वत्रीक निवडणुक–२०२४ चे काटोल नरखेड विधानसभेचे आमदार पदाकरीता उभा असलेला त्यांचा मुलगा सलील देशमुख यांचे प्रचार सभा कार्यक्रम संपवुन मा. श्री. अनिल देशमुख,माजी गृहमंत्री परत जात असतांना आपण ज्या वाहनात बसलेले होते ते वाहन मा. श्री अनिल देशमुख साहेबांचे वाहनांचे मागे–मागे जात होते, आपण बसले असलेले वाहनात तांत्रीक बिघाड होवुन वाहन बंद पडल्याने मा. अनिल देशमुख साहेबांचे वाहन पुढे गेले व आपण बसुन असलेले वाहन हे मागे पडल्याने मा. श्री अनिल देशमुख यांचे वाहनावर अज्ञात व्यक्तीचे समुहाने दगडफेक करुन त्यांना जख्मी केले. त्यावेळेस त्यांना सुरक्षाप्रदान करता आली नाही. आपण कर्तव्यात संतर्कता ठेवली असती तर ही घटना टाळता आली असती, आपले बेजबाबदार व निष्काळजी कृत्यामुळे पोलीस विभागाची जनमानसातील प्रतिमा मलीन झाली आहे.

२) मा.श्री.अनिल देशमुख, माजी गृहमंत्री यांनी सुरक्षा रक्षक यांना मागील वाहनात बसण्यास सांगीतले ही बाब आपण वरिष्ठांना कळविणे आवश्यक होते किंवा तसा पत्रव्यवहार करणे आवश्यक होते. तसेच विशेष पोलीस महानिरीक्षक (का.व.

सु.) महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कडील कार्यालयीन दिनांक ०५/०९/२०२२ च्या पत्रात दिलेल्या निर्देशाप्रमाणे संरक्षीत व्यक्ती यांच्या वाहनाच्या पुढील सीटवर बसणे अपेक्षित आहे, याकरीता आग्रही राहिले पाहिजे, आग्रह करून सुध्दा संरक्षीत व्यक्ती वाहनात बसू न दिल्यास त्याबाबत नियंत्रण कक्ष किंवा स्टेशन डायरीला नोंद घेतली पाहिजे असे निर्देश दिलेल आहेत. परंतु आपण याबाबत काहीही केलेले नाही. यावरून आपण मा.श्री.अनिल देशमुख, माजी गृहमंत्री यांचे सुरक्षेप्रती कर्तव्यात निष्काळजीपणा बेजबाबदारपणा केला आहे.

३) लोकमत या वृत्तपत्रात दिनांक १९/११/२०२४ रोजी '' अनिल देशमुख यांच्यावर हल्ला, वाहनावर दगडफेक'' देशोन्नती या वृत्तपत्रात दिनांक १९/११/२०२४ रोजी चे वर्तमानपत्रात ''माजी गृहमंत्री अनिल देशमुख यांच्यावर हल्ला'' अशी बातमी प्रसारीत झाल्यामुळे पोलीसांची जनमानसातील प्रतिमा अत्यंत मलीन झालेली आहे.

वरील कसुरीबाबत आपली विभागीय चौकशी करण्यात आली असता विभागीय चौकशी अंती अ.क्र. १ ते ३ वर नमूद दोषारोप पुर्णत:सिध्द झाले असल्याबाबत विभागीय चौकशी अधिकारी यांनी त्यांचे समारोप अहवालात नमुद केले आहे.

आपणास महाराष्ट्र पोलीस नियम १९५६ (शिक्षा व अपील) मधील नियम—३ अन्वये **'' देय असलेली वार्षिक वेतनवाढ ०३ वर्षाकरीता कायम स्वरूपी स्थगीत ठेवणे ''** या शिक्षेची कारणे दाखवा नोटीस दि. २५/०३/२०२५ रोजी निर्गमित करण्यात आलेली असुन, सदरची नोटीस आपण दि. २६/०४/२०२५ रोजी स्वीकारून स्पष्टीकरण सादर केले. तसेच दि. २३/०५/२०२५ रोजी आपला आज्ञाकिंत कक्ष घेण्यात आला. सदर आज्ञांकीत कक्षात आपणास मा.श्री.अनिल देशमुख, माजी गृहमंत्री यांचे गाडीत न बसण्याचे कारणाबाबत विचारले असता, आपण मा.श्री.अनिल देशमुख, माजी गृहमंत्री यांनी मागील गाडीत बसण्याचे निर्देश दिल्याने आम्ही मागील गाडीत बसलो, याबाबत वरिष्ठांना का सुचीत केले नाही? याबाबत आपण काहीही ठोस उत्तर दिले नाही. आपण आज्ञांकीत कक्षात दिलेले स्पष्टीकरण तसेच कारणे दाखवा नोटीसच्या अनुषंगाने सादर केलेल्या स्पष्टीकरणाचे अवलोकन केले असता, आपण दिलेले स्पष्टीकरण अशंत: समाधानकारक असल्याने कारणे दाखवा नोटीस मध्ये प्रस्तावित केलेल्या शिक्षेत अशंत: बदल करून खालील प्रमाणे आदेश देत आहे.

**अंतिम आदेश**

मी, हर्ष ए.पोद्दार (भापोसे), पोलीस अधीक्षक, नागपुर जिल्हा ग्रामीण, नागपुर पोशि/१२६१ आदित्य देशमुख, नेमणुक पो.स्टे. वेलतुर, नागपूर ग्रामीण यांना **'' देय असलेली वार्षिक वेतनवाढ ०१ वर्षाकरीता कायम स्वरूपी स्थगीत ठेवणे ''** ही शिक्षा देण्यात येत आहे. सदरहू शिक्षेने आपण व्यथीत होत असल्यास सदरहू आदेश स्वीकारल्याचे दिनांकापासुन ६० दिवसाचे आत या कार्यालया मार्फत विशेष पोलीस महानिरिक्षक, नागपुर परिक्षेत्र, नागपुर यांचे कडे अपील करू शकतात.

.

# भाग—४ (बक्षिस आदेश)

**क्रमांक नाजिग्रा/डी.१४/बक्षिस अहवाल/पो.अधि—पो.कर्म/४१२०/२०२५ नागपूर दिनांक १८/०५/२०२५**

## <u>आदेश</u>

पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण आस्थापनेवरील पोलीस अधिकारी अमंलदार यांनी मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे कडुन राबविण्यात आलेली E-HRMS संगणक प्रणाली मध्ये संपुर्ण राज्यातुन नागपुर ग्रामीण मध्ये 100% संगणक प्रणाली पुर्ण करून उल्लेखनीय कामगीरी केले. खालील नमुद पोलीस अधिकार/अमंलदार व मंत्रालयीन कर्मचारी यांनी अशी उत्कृष्ठ कामगीरी भविष्यातही यांच प्रमाणे करावे करिता त्यांना त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे प्रोत्साहन म्हणुन बक्षिस मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र | नाव अधिकारी व अमंलदार | नेमणुक | मंजुर बक्षिस रक्कम |
|---|---|---|---|
| १ | पो.उप.नि. ओम राजा कलेगुरवार | प्रभारी E-HRMS | रू. ५,०००/— सि.नोट |
| २ | कार्यालय अधिक्षक/उमेश फुंदे | कार्यालय पो.अ.ना.ग्रा. | सि.नोट |
| ३ | क.श्रे.लि/ प्रजा अगम | कार्यालय पो.अ.ना.ग्रा. | सि.नोट |
| ४ | मपोशि/८८२ रजनी जावने | बिनंतारी संदेश विभाग | रू. १०,०००/— जी.एस.टी. |
| ५ | मपोशि/१००७ वैष्णवी पवार | सिसीटीएनएस.ना.ग्रा. | रू. ५,०००/— जी.एस.टी. |
| **एकुण** | | | **रूपये. २०,०००/—** |

# भाग —५ (प्रशिक्षण,परवानगी,अग्रीम)

**१)क्रमांक :नाजीग्रा/डी -१३ /नावात बदल/मपोहवा /९०३ वंदना /२०९८५/२०२४ नागपूर दिनांक २५/०९/२०२४**

## आदेश

मपोशी/९०३ वंदना बळीराम साळवे नेमणुक पो.स्टे बेला, नागपूर ग्रामीण यांनी जुन्या नावात बदल करून राजपत्रान्वये नवीन नावाची नोंद केलेली आहे व त्याबाबतची अधिसूचना .महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये प्रसिध्द केलेली आहे .

| अ.क्र. | सेवापुस्तकात असलेले नांव | नेमणूक | राजपत्रात नमूद केल्याप्रमाणे बदल करावयाचे नांव | महाराष्ट्र शासन राजपत्र क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | वंदना बळीराम साळवे | पो.स्टे बेला | वंदना चंदन गाढवे | गुरुवार ते बुधवार, मार्च १९-१७-, २०१९ / -फाल्गुन२०२६ शके १९४२ अन्वये एन -२०३२८९३ |

करिता वर नमूद महिला पोलीस कर्मचारी यांचे सुधारित नावाची नोंद कार्यालयीन अभिलेखांत करण्यास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे .

**२)क्रमांक :नाजीग्रा/डी -१३ /नावात बदल/ मपोशी/** ८०४ रिता **/२०९४७/२०२४ नागपूर दिनांक २५/०९/२०२४**

## आदेश

मपोशी/ **८०४ रिता दिलीपराव तायडे** नेमणुक पो.स्टे बेला, नागपूर ग्रामीण यांनी जुन्या नावात बदल करून राजपत्रान्वये नवीन नावाची नोंद केलेली आहे व त्याबाबतची अधिसूचना .महाराष्ट्र शासन राजपत्रामध्ये प्रसिध्द केलेली आहे .

| **अ.क्र.** | **सेवापुस्तकात असलेले नांव** | **नेमणूक** | **राजपत्रात नमूद केल्याप्रमाणे बदल करावयाचे नांव** | **महाराष्ट्र शासन राजपत्र क्रमांक व दिनांक** |
|---|---|---|---|---|
| १. | **रिता दिलीपराव तायडे** | दळणवळण व माहिती तंत्रज्ञान विभाग, नागपूर ग्रामीण | **रिता राहुल खेडीकर** | गुरुवार ते बुधवार, मार्च १४-१०-, २०१९ -फाल्गुन १९ /४५ शके १९४६ अन्वये एन आर २४११२ |

करिता वर नमूद महिला पोलीस कर्मचारी यांचे सुधारित नावाची नोंद कार्यालयीन अभिलेखांत करण्यास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे .

**३)**क्रमांक : नाजिग्रा / डी–9(अ)**/ F.N** / 7 / 3 / **VIP SECURITY COURSE-07/**2025 / नागपुर, 4064 दि. 15 / 05 / 2025

—: आ दे श :—

संचालक, आणि विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र इंटेलिजन्स ॲकेडमी (MIA) पुणे यांचेकडील बिनतारी संदेश क्रमांक MIA/TRG/APRIL/VIP SECURITY COURSE-07/PUNE/2005,दिनांक 07 / 05 / 2025 अन्वये दिनांक 19.05.2025 ते 23.05.2025 पर्यंत 5 दिवस “VIP SECURITY COURSE ” प्रशिक्षण सत्र 07 / 25 महाराष्ट्र इंटेलिजन्स ॲकेडमी, रारापोबल गट क्र. 1, रामटेकडी, (MIA) पुणे येथे

आयोजित केले असुन सदर प्रशिक्षणाकरीता या घटकातुन पोशि/1775 श्रीकांत राऊत, नेमणुक पोलीस मुख्यालय नागपूर ग्रामीण, नागपूर यांची निवड करून पाठविण्यात येत आहे.

४)क्रमांक : नाजिग्रा/डी–9(अ)/ **BDDS REFRESHER COURSE -02**/4063 /2025, नागपुर दि 15/05 /2025

–: आ दे श :–

संचालक, आणि विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र इंटेलिजन्स ॲकेडमी(MIA) पुणे यांचेकडील बिनतारी संदेश क्रमांक MIA/TRG/MAY/BDDS REFRESHER COURSE NO.02/25/PUNE/2004, दिनांक 07.05.2025 अन्वये दिनांक 19.05.2025 ते 23.05..2025 पर्यंत 5 दिवस "BDDS REFRESHER COURSE " प्रशिक्षण सत्र 02/25 महाराष्ट्र इंटेलिजन्स ॲकेडमी, रारापोबल गट क्र. 1, रामटेकडी, (MIA) पुणे येथे आयोजित केले असुन सदर प्रशिक्षणाकरीता या घटकातुन पोहवा/406 दुर्गेश कटरे नेमणुक, नक्षल सेल,नागपुर ग्रामीण नागपुर यांची निवड करून पाठविण्यात येत आहे.

**5)क्र:-नाजिग्रा / डी-9डी / चापोशी - परिक्षा परवानगी /** 38395/ 2025 **नागपुर दिनांक** 14 / 05/ 2025

**आदेश**

खालील नमुद चालक पोलीस शिपाई यांना खालील नमुद अटीप्रमाणे सरळसेवा व स्पर्धा परिक्षेला बसण्याची परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र | पोलीस अंमलदारांचे नांव हुददा | नेमणुक | मागीतलेली परवानगी |
|---|---|---|---|
| 1 | चापोशी /2142 प्रदीप युवराज औरासे | मोटार परिवहन विभाग | सरळसेवा व स्पर्धा परिक्षेला बसण्याची परवानगी |
| 2 | चापोशी /2146 निखील अशोक शहारे | मोटार परिवहन विभाग | सरळसेवा व स्पर्धा परिक्षेला बसण्याची परवानगी |

अटी:-

1)शासकीय कामात व्यत्यय होणार नाही.
2)परिक्षेच्या पुर्व तयारीकरीता रजा देणे बंधनकारक राहणार नाही.
3)परिक्षेकरीता रजा घ्यावी लागेल
4)निकडीचे वेळी परिक्षा परवानगी रदद करण्यांत येईल.

Signed by
Umesh Ghaninath Funde
Date: 08-07-2025 19:04:11

**(उमेश फुंदे)**
कार्यालय अधिक्षक
पोलीस अधीक्षक,कार्यालय
नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर

प्रति,
सर्व ठाणेदार/रापोनि.मुख्या./बि.संदेश/जि.वि.शा/नियं.कक्ष/स्था.गु.शा./मो.प.वि./पो.अधि.वा.शाखा/अ.पो.अधि.वा.शाखा/म.त.नि/कार्या अधिक्षक/डी—४/डी—७/डी—९बी/डी—११/डी—१२/डी —१३/ डी —९—बी/ डी —९—सी/डी —९—डी/लघुलेखक/ वे.नि.लपीक/ कल्याणशाखा/सुरक्षाशाखा / वाहतुक शाखा ना.ग्रा.
प्रत सस्नेह अग्रेषित :— अ.पो.अधि.नाग्रा/महामार्ग सूरक्षा पथक/नागरी हक्क संरक्षण केंद्र.
प्रतिलिपी :— पो.उप अधि.(गृह) व सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी ना.ग्र. यांना आवश्यक कार्यवाहीस
२/— सदरची मराठी साप्ताहीक पोलीस पत्रिका ही रोलकॉलवर वाचून दाखविण्यात यावी व संबंधितास समज देऊन त्यांचा नावापूढे त्यांची स्वाक्षरी घेण्यात यावी.